PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Bin Kamacha Navra
Year: 1984

Song: ZunjurMunjur Paus Maryan
Lyricist: Santaram Nandgaonkar

हो झुंजुरमुंजुर पाऊस मार्‍यानं
अंग माझं ओल चिंब झालं रं
आ हा
हो टिपूर टिपूर पाण्याची घुंगुर
हिरव्या हिरव्या झरीवरी आली रं
बिगीनं ये साजणा
बिगीनं ये ये ये साजणा
हो झुंजुरमुंजुर पाऊस मार्‍यानं
अंग माझं ओल चिंब झालं रं

ढगानं काळं निळं
आभाळ आनंदलं
ढगानं काळं निळं
आभाळ आनंदलं
झाडाला हा पानाला
झाडाला पानाला
थेंब थेंब पानी डसलं रं
डसलं रं
ही झर झर झर
गार गार सर
केसांच्या या जाळयामंधी आली रं
बिगीनं ये साजणा
बिगीनं ये ये ये साजणा
हो झुंजुरमुंजुर पाऊस मार्‍यानं
अंग माझं ओल चिंब झालं

डोळं हे पाणावलं
काळीज आसावलं
डोळं हे पाणावलं
काळीज आसावलं
पिरतीनं हं... धुंदीनं
पिरतीनं धुंदीनं
अंग अंग माझं सजलं रं
सजलं रं
मी पाण्यात भिजून
तुझयासाठी वेडीपिशी झाले रं
बिगीनं ये साजणा
बिगीनं ये ये ये साजणा
हो झुंजुरमुंजुर पाऊस मार्‍यानं
अंग माझं ओल चिंब झालं रं
हो टिपूर टिपूर पाण्याची घुंगुर
हिरव्या हिरव्या झरीवरी आली रं

अंग माझं ओल चिंब झालं रं
अंग माझं ओल चिंब झालं रं
अंग माझं ओल चिंब झालं रं
अंग माझं ओल चिंब झालं रं

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*